# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.2333536-40, 2348001-05

**E-mail** contact@chhsambhajinagarmc.org,
est1@chhsambhajinagarmc.org


दिनांक :- २८/०८/२०२६.

## प्रेस नोट

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील एकूण ११ विविध संवर्गातील सरळसेवेच्या २२२ पदांची लेखी ऑनलाईन परीक्षा IBPS संस्थेमार्फत दिनांक ०८/०७/२०२६ ते दिनांक ०९/०७/२०२६ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. त्यापैकी IBPS संस्थेने उपअग्निशमन केंद्र अधिकारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, उद्यान सहाय्यक व अनुरेखक या ०५ पदांचा निकाल महानगरपालिकेस सादर केला असून तो महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरीत ०६ पदांचा निकाल कंपनीकडून प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

याद्वारे असेही स्पष्ट करण्यात येते की, सदर पदांची परीक्षा घेणे व निकाल तयार करुन महानगरपालिकेस पाठविणे याबाबतची संपूर्ण प्रक्रिया ही IBPS संस्थेमार्फत केली जाते. सदर संस्थेकडून PDF स्वरुपात निकाल प्राप्त झाल्यानंतरच तो महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतो.

सदरची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पध्दतीने पार पाडली जाते. यासंदर्भात कोणत्याही आमिषाला किंवा भूलथापांना बळी पडू नये. तसेच यासंदर्भात कोणी चुकीची माहिती देत असेल किंवा कोणतेही अमिष दाखवीत असेल तर अशा व्यक्तीची माहिती महानगरपालिकेस कळवावी.

RANJEET A PATIL
Digitally signed by RANJEET A PATIL
Date: 2026.08.28 21:25:58 +05'30'

(रणजीत आ. पाटील)
अतिरिक्त आयुक्त-१
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका